महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती
विज्ञान निर्भयता नीती
मध्यवर्ती कार्यालय : 'तारांगण', कुंदा स्मृती केंद्र, १२, युनायटेड वेस्टर्न बँक कॉलनी, शाहू नगर, गोडोली, सातारा-४१५००१.
☎: (०२१६२) २२०६५९, ■ Visit our Website : www.antisuperstition.org ■
कार्यालय : 'भास्कर', ६८, कालीकादेवी नगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे - ४२४ ००१.
भ्रमण ध्वनी : ९४२२७९०६१०,८९७५१३०६०९ Email : avinashpatilmans@gmail.com

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व आटपाट निर्मिती आयोजीत
# विवेक राष्ट्रीय लघु पट महोत्सव- २०१७
## भाग १- "जात" विषयाचे विविध पैलू

- **जाती आधारित भेदभाव:**-कायद्यानेअस्पृश्यता संपली अस म्हंटल जात असलं तरी शैक्षणिक, खासगी क्षेत्रात, जमीनघेताना-देताना, विवाह आणि शिफारशी करताना सजातीय लोकांना त्याचे लाभ देणे तसेच इतर जातीय लोकांना वगळणे असा व्यवहार सर्रास होताना दिसतोय.वेगवेगळ्याप्रकारेअश्या जातीय भेदभावाला समाज सामोरा जातआहे.
- **जाती आधारित अर्थव्यवस्था :** गावगाड्यात आज ही मोठ्याप्रमाणात व्यवसाय व उद्योग जातीआधारित असल्याने त्याबाबतच्या संधी वाढू शकलेल्या त्यामुळे गावगाड्यात व्यवसाय व उद्योग यांना घेऊन विकास होऊ शकला नाही व गावगाडा पुढे जाऊ शकला नाही. जागतिकीकरण आणि उदारीकरण यांचा फायदा जाती आधारित व्यवसाय व उद्योग करणाऱ्या लोकांना भेटू शकला नाही.
- **जातींचे संस्कृतीकरण :** जातइमारतीच्या वरील जातींचे सांस्कृतिक राजकारण हे कायम नीच समजल्या जाणाऱ्या जातींवर अधिसत्ता मिळविण्याकरिताकेले जाते, उदाहरण – उना येथे गायीवरून दलितांना मारहाण करणे. शिक्षणातून ब्राह्मणी प्रतिक-प्रतिमायांचेउदात्तीकरण करणे. त्यातून काही जाती या आपल्यावरील जातींच्या संस्कृतीचे अनुकरण करतात. जातींची मानसिक गुलामगिरी त्यातून टिकवली जाते.
- **जात आणि स्त्री :** बाबासाहेबआंबेडकरयांनी स्त्रीला जातींचे प्रवेशद्वार म्हंटले होते, ज्यात स्त्रियांवर जेवढ्या मोठ्या प्रमाणावर निर्बंध असतील तेवढी जाती व्यवस्था ही घट्ट बनतजाते, ज्यातविवाह बंदी सारख्या घटना असतात त्याच अनुषंगाने शिक्षण कमी देणे आणि पुरुष सत्ता कायम ठेवणे. जात हे स्त्री स्वातंत्र्यातील सर्वात मोठा अडसर आहे.
- **आंतरजातीय विवाह:**-जाती व्यवस्थेने लग्न संस्थेला देखील प्रभावित केलेले आहे, एकाच जातीत विवाह करण्याची प्रथा मोठ्या प्रमाणावर असल्याने आणि एकाच जातीत लग्न करणे हा प्रतिष्ठेचा विषय असल्याने व्यक्तिगत पातळीवर प्रेमाचे पर्यवसान लग्नात होताना जातीच्या आधारावर विवाहासनकार देण्याचे अनेक प्रसंग घडतात. त्याच प्रमाणे प्रेमाला महत्व देत जात नाकारत असे विवाह होतात. त्यात संघर्ष आणिसंवाद अश्या दोन्ही पातळ्यांवर जाती व्यवस्थेला शह दिला जातो.
- **जात पंचायत :** जातींचे स्वतःचे संघटन असते जे न्यायपालिकेप्रमाणे काम करत असून त्याच जातीतील धनाढ्य लोक त्याचेनेतृत्व करतात. जातीमधील तंटे, कौटुंबिक वाद,वैवाहिकवादसोडवण्याकरिताही व्यवस्था काम करते त्याच्या न्याय देण्याची पद्धत ही हिंसक, अमानवी व पाशवी असते, त्याचा सर्वात मोठा फटका स्त्रियांना बसला आहे.

# महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती

विज्ञान निर्भयता नीती

मध्यवर्ती कार्यालय : 'तारांगण', कुंदा स्मृती केंद्र, १२, युनायटेड वेस्टर्न बँक कॉलनी, शाहू नगर, गोडोली, सातारा-४१५००१.
☎: (०२१६२) २२०६५९, ■ Visit our Website : www.antisuperstition.org ■

कार्यालय : 'भास्कर', ६८, कालीकादेवी नगर, संयमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे - ४२४ ००१.
भ्रमण ध्वनी : ९४२२७९०६१०,८९७५१३०६०९ Email : avinashpatilmans@gmail.com

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व आटपाट निर्मिती आयोजीत
## विवेक राष्ट्रीय लघु पट महोत्सव- २०१८
## भाग २- "जात" विषयाचे विविध पैलू

- **जातींचे राजकारण :** जात या घटकाचा राजकारणावर मोठ्याप्रमाणावर परिणाम झाला असून राजकीय पक्ष आणि नेते जात या घटकाचा वापरकरून मतांचे विभाजन किंवा ध्रुवीकरण घडवून आणतात. काही पक्ष हे जातीय पायावर उभे आहेत, त्यातीलमागास जातींचे पक्ष हे हक्कांसाठी तर उच्च जातीचे पक्ष हे हितसंबंध कायम ठेवण्यावर भर देतात. जातीच्या आधारावर राजकारण करून विकासाचे मुद्दे बाजूला पडतात तर अस्मितांचे मुद्दे अधिक तीव्र होतात.
- **आरक्षण :-** आरक्षण हा सामाजिक न्यायाचा पाया असल्याने समाजातील मागासवर्गीय लोकांना देण्याकरिता शासनाकडून आरक्षण देण्यात येत,तशी तरदूत राज्यघटनेत करण्यात आली असून त्यासाठी त्याची अंमलबजावणी अधिकारशासनाच्याअखत्यारीत देण्यात आले आहे.परंतू याबाबत काही महत्वाच्या बाबी लक्षात येतात की, सामान्यत: सवर्णसमाजात मागासवर्गीय समाजाबाबत आकस आहे.त्यासाठी आर्थिक निकष ठेवण्याचा मुद्दा जोर धरतो आहे, तर दुसऱ्याबाजूला अनेकअमागास जाती आरक्षण मागत आहेत, त्यासाठी मोठ्याप्रमाणावर आंदोलन करताना दिसत आहेत. तसेच याच आरक्षणाने मागास जातीतील घटकांना विकासाची संधी निर्माण करून दिली आहे.अश्या आरक्षणाच्या विविध पैलूचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे.
- **सफाई कामगारांचे प्रश्न:** विशिष्ठ जातीच्या लोकांना कायम वंशपरंपरागत हे काम करावं लागतं आहे.
- **जातीय हिंसा**—गावकुसात जातीच्या उच्च-नीच भावनेतून त्याच्याशी निगडीत भौतिक प्रश्नावरून निर्माण झालेल्या वादात दलित सवर्ण असा संघर्ष उफाळून आलेला आहे. ज्याची मोठी झळ सर्वाधिक वेळा दलितांना भोगावी लागली आहे.यात बलात्कार, खून, वस्ती जाळणे अश्या विविध प्रकारच्या हिंसक कृत्य सामावलेले आहे.जातीय हिंसा आणि त्यावरील उपाययोजना म्हणून अॅट्रोसिटी कायदा केला गेला व त्याची अंमलबजवणी करून हे प्रकार थांबवण्यासाठी प्रयत्न केले गेले आहेत, परंतू त्याला उल्लेखनीय यश प्राप्त झालेले नाही.
- **जात आणि मानव विकास :** समाजातीलदलित, आदिवासी व अल्पसंख्यांक समुदायाचा शैक्षणिक, मानसिक, आर्थिक, राजकीय विकास होण्यासाठी असलेल्या व्यापक दृष्टीकोनाच्या अभावामुळे हे समुदाय मागास राहिले आहेत, त्याच्या विकासाचे नवीन निकष उभे करून त्यावर काम करण्याची गरज आहे.
- **जात आणि राष्ट्रीय एकात्मता :**जातही राष्ट्र म्हणून उभे राहण्याच्या बंधुता या तत्वाच्या थेट विरोधात असल्यानेसमाजभान राष्ट्रीय होऊ शकत नाही. प्रत्येक जात ही एक स्वतंत्र राष्ट्र आहे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. त्याप्रमाणे तुकड्या तुकड्यामध्ये विभागलेला समाज हा एकसंध होऊन विकासाच्या मार्गावर चालण्या ऐवजी राष्ट्र विघातक कृत्य अधिक करतो. त्यामुळे जात हा घटक थेट राष्ट्रीय एकात्मतेच्याविरोधात आहे अस दिसून येते.